देशदूत यूट्युब चॅनलसाठी क्यूआर कोड स्कॅन करा

YouTube

www.deshdoot.com

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

देशदूत शब्दगंध

रविवार विशेष पुरवणी

राजकारण, विशेष लेख, शब्दकोडे आणि बरंच काही

वाचा दर रविवारी

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ | अंक ३५१ | गुरुवार, दि. २८ ऑगस्ट २०२५ | पाने १२+८ | किंमत ₹ ५

## आतील पानात

**संपादकीय**
खड्ड्यांचे बाप्पांनाही धक्के

**प्रासंगिक**
पर्युषण पर्व : आत्मोन्नतीचे महापर्व

**पडसाद**
सार्वजनिक आरोग्य व्यवस्थाच व्हेंटिलेटरवर!



# मंगलमूर्ती विराजमान

## बाप्पाच्या आगमनाने सर्वत्र चैतन्य

**नाशिक । प्रतिनिधी**

भर पावसात, ढोल-ताशांच्या गजरात, गुलालाची उधळण करत टाळ्यांच्या निनादात आणि गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात बुधवारी लाडक्या श्रीगणेशाची घरोघर प्रतिष्ठापना करण्यात आली.

गणरायाच्या आगमनाप्रित्यर्थ सकाळपासूनच शहरात उत्साही वातावरण होते. बाप्पाच्या आगमनाने भाविकांमध्ये उत्साह संचारला. यंदा ११ दिवस बाप्पांच्या उत्सवाचे चैतन्य राहणार आहे. गणेश चतुर्थीच्या निमित्ताने मंगळवारी सायंकाळपासूनच शहरातील बाजारपेठा फुलून गेल्या होत्या. बुधवारी सकाळपासूनच गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाचा जयघोष करत, ढोल-ताशांच्या गजरात भाविकांनी गणेशमूर्ती घरी आणून दुर्वा, फुले, धूप, दीप, पंचारती ओवाळत साग्रसंगीत मनोभावे पूजन केले. शहरात ३५ मौल्यवान गणपती मंदिरात नव्याने आणलेल्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाली. घरोघरी बाप्पांच्या स्वागताबरोबरच शहरातील ऑफिसेस, दुकाने, राजकीय पक्षांची कार्यालये आदी ठिकाणीही गणपतीची स्थापना करून प्रत्येकाने आपापल्या परीने बाप्पांचे जोरदार स्वागत केले.

### श्रींचा आगमन सोहळा

श्री सिद्धिविनायक चांदीच्या गणपतीचा पारंपरिक पद्धतीने भव्य जल्लोषात आगमन सोहळा झाला. सकाळी ११ वाजता संगमनेरकर वाडा, तिवंधा चौक, जुने नाशिक येथून भव्य मिरवणूक निघाली. यंदा या गणेश मंडळाने खाटू श्यामबाबांचा आकर्षक देखावा सादर केला आहे.

## थोडक्यात

### शिवतीर्थवर ठाकरे बंधूंची भेट

**मुंबई ।** शिवसेना उबाठा पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे आज गणपतीच्या निमित्ताने सहकुटुंब राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी गेले होते. यापूर्वी सार्वजनिक कार्यक्रम किंवा कौटुंबिक सोहळ्यातच एकत्र येताना दिसत होते. मात्र, आज गणपतीच्या निमित्ताने उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे, राज ठाकरे, शर्मिला ठाकरे, अमित ठाकरे हे संपूर्ण ठाकरे कुटुंब घरात एकत्र आले. राज ठाकरे यांच्या घरी भोजन करून उद्धव ठाकरे पुन्हा मातोश्रीकडे रवाना झाले.

### इमारत कोसळली

**पालघर ।** जिल्ह्यात वसई-विरार येथे एका चार मजली इमारतीचा मागील भाग एका चाळीवर कोसळून पाच जणांचा मृत्यू तर नऊ जण जखमी झाले. मंगळवारी मध्यरात्री ही घटना घडली. घटनेनंतर तातडीने एनडीआरएफच्या जवानांनी बचावकार्य सुरू केले.

## सोने-चांदी

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | १,०१,२०० |
| २२ कॅरेट | ९३,१०० |
| चांदी (प्रतिकिलो) | १,१७,५०० |

## तापमान

किमान : २२.२°
कमाल : २६.१°

## मिश्किली

धनंजय एकबोटे



जिवंत देखावा नाही बाप्पा. शुल्लक स्वार्थापोटी समाजात भांडण लावण्याचे पाप सुरू आहेत सध्या.

# आंदोलनासाठी एक दिवस

## पोलिसांची अटींसह परवानगी; भगवे वादळ मुंबईकडे

- मनोज जरांगे यांचे पोलिसांना हमीपत्र
- चर्चेसाठी तयारी पाहिजे : विखे

**मुंबई । वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्यासाठी मुंबई पोलिसांनी परवानगी दिली आहे. ही परवानगी सध्या फक्त एका दिवसासाठी असून, त्यात काही अटी-शर्ती घालण्यात आल्या आहेत. त्यानुसार आंदोलनादरम्यान गणेशोत्सव सुरू असल्यामुळे वाहतुकीला अडथळा येणार नाही आणि नागरिकांना त्रास होणार नाही, असे वर्तन करणे अपेक्षित आहे. तसेच हे आंदोलन सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतच असेल, असे मुंबई पोलिसांनी त्यांच्या आदेशात म्हटले आहे.

**मराठा आरक्षण आंदोलन**

पोलिसांनी परवानगी दिल्यानंतर जरांगे पाटील म्हणाले, जर सरकार एका दिवसात आमच्या मागण्या मान्य करत असेल तर त्यांच्या अटी आम्हाला मान्य आहेत. जर आम्हाला एका दिवसाची परवानगी दिली तर सरकारने एका दिवसात आरक्षण द्यावे. पण जर मागण्या मान्य केल्या नाहीत तर आम्ही आंदोलन मागे घेणार नाही.

यादरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी पोलिसांना एक हमीपत्र दिले आहे. या हमीपत्रात त्यांनी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणि पोलिसांच्या अटी-शर्तींचे पालन करण्यासाठी २० आश्वासने दिली आहेत.

गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देत मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आर या पारच्या लढाईचा नारा दिला आहे. मुंबईकडे कूच करण्यापूर्वी त्यांनी मराठा बांधवांशी संवाद साधला. मुंबईत शांततेत आमरण उपोषण सुरू करणार असल्याचे जाहीर करताना, त्यांनी सर्वांना संयम राखण्याचे आवाहन केले. सकाळी १०:३० वाजता जरांगे यांच्यासह शेकडो गाड्यांमधून मराठा आंदोलक मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत.

जरांगे म्हणाले, ही आपली शेवटची लढाई आहे. आता आर या पारची लढाई करायची आहे. आपल्याला डिवचण्याचा प्रयत्न केला जाईल, पण कोणत्याही परिस्थितीत संयम ढळू द्यायचा नाही. डोक्याने ही लढाई जिंकायची आहे. कितीही दिवस लागले तरी लढा सुरूच ठेवायचा आहे. मराठा समाजाची मान खाली जाईल असे कुणीही वागू नये.

> चर्चा करण्यासाठी आंदोलनकर्त्यांची तयारी पाहिजे. त्यांची तयारी असेल तर आम्हीदेखील तयार आहोत. मात्र त्यासाठी दोन्हीही बाजूने समन्वय झाला पाहिजे. उच्च न्यायालयाच्या निर्देशाबाबत जरांगे पाटलांनी निर्णय करायचा आहे. शासनाची यात कुठलीही भूमिका नाही. सरकारने यापूर्वीही प्रतिष्ठेचा प्रश्न केलेला नव्हता आणि आताही नाही.
>
> ■ **राधाकृष्ण विखे पाटील,** अध्यक्ष, मंत्रिगट उपसमिती



### या आहेत मुख्य अटी

- आंदोलनाला एकावेळी फक्त एकाच दिवसाची परवानगी असेल. शनिवार, रविवार किंवा शासकीय सुट्टीच्या दिवशी परवानगी मिळणार नाही.
- ठराविक वाहनांनाच परवानगी
- आंदोलनात जास्तीत जास्त पाच हजार लोकच सहभागी होऊ शकतात. आझाद मैदानासाठी सात हजार चौ. मीटर जागा राखीव
- आंदोलनाच्या वेळी मोर्चा काढता येणार नाही.
- परवानगीशिवाय माईक, स्पीकर किंवा गोंगाट करणारी साधने वापरता येणार नाहीत.
- आंदोलनाची वेळ सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतच मर्यादित आहे. त्यानंतर मैदानात थांबता येणार नाही.
- आंदोलनाच्या जागेत स्वयंपाक करणे, कचरा टाकण्यास बंदी
- आंदोलनाच्या काळात गणेशोत्सव सुरू असल्याने वाहतुकीला अडथळा, नागरिकांना त्रास किंवा धार्मिक भावना दुखावणारे वर्तन करता येणार नाही.
- आंदोलनात लहान मुले, गरोदर स्त्रिया आणि वृद्धांना सहभागी करू नये.

### ड्रोनची नजर

जालना पोलिसांचे जवळपास ४५० कर्मचारी, अधिकारी मनोज जरांगे यांच्या मोर्चासाठी बंदोबस्तात तैनात आहेत. दोन एसआरपीएफच्या कंपन्यांसह बॉम्बशोधक पथक देखील असून मोर्चावर पोलिसांच्या ड्रोनची नजर असणार आहे.

### अश्रूंचा बांध फुटला

महाकाळा अंकुशनगर येथे कुटुंबियांकडून मनोज जरांगे पाटील यांचे औक्षण करण्यात आले. यादरम्यान मनोज जरांगे पाटील यांच्या कुटुंबाला अश्रू अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी मुलगा शिवराज यांनी त्यांना दोन कवड्याच्या माळ घातल्या. यावेळी जरांगे पाटील यांच्याही डोळ्यांत अश्रू तरळले. त्यांनी मुलींची समजूत काढली.

# मतचोरीनंतर आता देणगी

## राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला घेरले

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतचोरीनंतर आता गुजरातमधील अज्ञात राजकीय पक्षांना मिळालेल्या ४३०० कोटी रुपयांच्या देणगीबद्दल निवडणूक आयोगावर पुन्हा प्रश्नांची सरबत्ती केली आहे. राहुल गांधी यांनी एका दैनिकाचा अहवाल शेअर करत म्हटले आहे की, या १० पक्षांनी एवढी मोठी देणगी घेतली, पण खर्च फक्त ३९ लाख रुपये दाखवला.



त्यांनी एक्सवर लिहिले की, गुजरातमध्ये काही अज्ञात पक्ष आहेत ज्यांचे नाव कोणीही ऐकले नाही; परंतु त्यांना ४३०० कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत. या पक्षांनी फार कमी वेळा निवडणुका लढवल्या आहेत किंवा त्यावर खर्च केला आहे. हे हजारो कोटी कुठून आले? त्यांना कोण चालवत आहे? आणि पैसे कुठे गेले? निवडणूक आयोग चौकशी करेल का? की ते येथेही प्रतिज्ञापत्र मागवेल? की ते स्वतः कायदा बदलेल, जेणेकरून हा डेटादेखील लपवता येईल?

दरम्यान, गुजरातमध्ये नोंदणीकृत १० निनावी राजकीय पक्षांना पान ८ वर »

# पीएम स्वनिधी योजनेला मुदतवाढ

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पीएम स्वनिधी योजनेच्या फेररचनेला आणि मुदतवाढीस मान्यता देण्यात आली आहे.

योजनेचा पहिला टप्पा ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत होता. पीएम स्वनिधी योजनेला मुदतवाढ ३१ मार्च २०३० पर्यंत देण्यात आली आहे. यासाठी ७३३२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. योजनेच्या फेररचनेनंतर ५० लाख नव्या लाभार्थ्यांसह एकूण १.१५ कोटी लाभार्थींपर्यंत पीएम स्वनिधीचा लाभ पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय यांच्यासह वित्तीय सेवा मंत्रालयाकडून योजनेची अंमलबजावणी केली जाईल. वित्तीय सेवा मंत्रालयाकडून कर्ज आणि क्रेडिट कार्ड सुविधा बँक आणि वित्तीय संस्थांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातील. योजनेतील फेरबदलांनुसार पहिल्या टप्प्यात फेरीवाले किंवा रस्त्यावरील विक्रेत्यांना पूर्वी जे १० हजार रुपयांचे कर्ज मिळायचे ते आता १५ हजार रुपये मिळेल. दुसऱ्या टप्प्यातील कर्ज २० हजारांवरून वाढवून २५ हजार पान ८ वर »

# कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे!

## वेतनेतर अनुदान : सरकारचे हात वर, शाळांचे पालकांच्या खिशात

**नाशिक । नरेंद्र जोशी**

कित्येक वर्षांपासून शाळांचे १२ टक्के वेतनेतर अनुदान सहा टक्क्यांवर आले. मात्र, तेही वेळेत मिळत नसल्याने दैनंदिन खर्च कसा भागवावा, असा प्रश्न शाळांना पडला आहे. काही शाळांनी वेगळीच शक्कल लढवत हा खर्च विद्यार्थ्यांवर लादून शालेय परीक्षा शुल्कातून तो भागवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे सामना चित्रपटातील आरती प्रभू यांच्या 'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे!' या चित्रगीताची आठवण होऊ लागली आहे.

गेली अनेक वर्षे शाळांचे मुख्याध्यापक शैक्षणिक साहित्य, क्रीडा साहित्य, विज्ञान साहित्य, इमारतीची देखभाल इत्यादी खर्च वेतनेतर अनुदानातून करत होते. ते अनुदान आता कित्येक वर्षांपासून शासनाने कमी केले. नंतर कमी केलेलेही वेळेत मिळेनासे झाले.

शाळेत विद्यार्थ्यांना अध्यापनाबरोबरच काही सोयीसुविधाही द्याव्या लागतात. विजेचे बिल, फर्निचर दुरुस्ती, विज्ञान साहित्य, खेळ साहित्य, शैक्षणिक साहित्य, विद्यार्थ्यांसाठी स्टेशनरी, शासनाला वेळोवेळी माहिती पाठवण्यासाठी लागणारे कागद आदी विविध खर्च असतात. हा खर्च लाखोंच्या घरात जातो. आता शासनाने हात आखडता घेतल्यानंतरही हा खर्च सुरूच आहे. मात्र तो कोठून केला जातो, तो कोण देतो याचा विचार ना कधी शासनाने केला, ना कधी शाळा व्यवस्थापनाने. एखाद्या शिक्षण पान ८ वर »

> शासकीय शाळांपेक्षा खासगी संस्थांच्या शाळांचा खर्च निम्माच असतो. त्यांना तरी अनुदान देण्यात हात आखडता घेण्यात काहीच अर्थ नाही. हा भार पालकांवर टाकणेही योग्य नाही. ते शासनानेच दिले पाहिजे.
>
> ■ **कोंडाजी आव्हाड,** अध्यक्ष, व्ही. एन. नाईक शिक्षण संस्था

# जि. प. चक्रीय आरक्षण संपुष्टात

## इच्छुकांच्या महत्त्वाकांक्षांना फुटले धुमारे

**नाशिक । विजय गिते**

जिल्हा परिषदेच्या गट आरक्षण सोडतीकडे इच्छुकांच्या नजरा लागलेल्या असतानाच ग्रामविकास विभागाने राखीव जागांचे चक्रीय आरक्षण संपुष्टात आणून नव्याने आरक्षण सोडत काढणार असल्याचे परिपत्रक काढले आहे. या निर्णयामुळे आदिवासी भागाबरोबरच बिगर आदिवासी भागातही स्थानिकांना मिनी मंत्रालयाच्या पायऱ्या चढण्याची पुन्हा संधी मिळणार आहे. यामुळे इच्छुकांच्या महत्त्वाकांक्षांना धुमारे फुटले आहेत.

जुन्या पद्धतीमुळे गट आरक्षित होण्याची सर्वाधिक धास्ती असलेल्या बिगर आदिवासी भागातील गुडघ्याला बाशिंग

**वेध निवडणुकीचे**

बांधून बसलेल्या इच्छुकांची निवडणूक लढवण्याची इच्छा आता पूर्ण होणार आहे. विशेषत: आदिवासी भागात बिगर आदिवासी भागाचे होणारे संभाव्य अतिक्रमण यामुळे टळणार असल्याने आदिवासी भागातील इच्छुकांनाही आता आपापल्या भागातूनच संधी मिळणार आहे. मात्र, बिगर आदिवासी भागातील राखीव प्रवर्गातील इच्छुकांचा मात्र हिरमोड होणार आहे.

नवीन आरक्षण सोडत परिपत्रकामुळे जिल्ह्यातील दिंडोरी, पेठ, कळवण, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी या सहा तालुक्यांमधील गट आदिवासींसाठीच राखीव होण्याची शक्यता आहे. तर बिगर पान ८ वर »

### असे राहील आरक्षण

नवीन रचनेनुसार जिल्हा परिषदेचे एकूण गट ७४ राहणार आहेत. यामध्ये आदिवासी क्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी २९, सर्वसाधारण २०, ओबीसी २० आणि अनुसूचित जाती प्रवर्गासाठी पाच असे आरक्षण निघणार आहे. यामध्ये ५० टक्के म्हणजेच ३७ जागा महिलांसाठी राखीव राहणार आहेत. त्यामुळे महिलांसाठी कोणते गट आरक्षित निघतात याकडे विशेषत:, पुरुष मंडळींचे लक्ष राहणार आहे.